साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पासाठी ऊस खरेदी करात सूट देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय, क्रमांकः बगास-२०१३/प्र.क्र.१६५/ऊर्जा-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ जानेवारी, २०१४.

**संदर्भ:-**

1. **शासन निर्णय, उ.ऊ.व का.वि., क्रमांकः अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दि.१४.१०.२००८.**
2. **शासन शुद्धीपत्रक,उ.ऊ.व का.वि., क्र.अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३-अ/ऊर्जा-७,दि.२७.१.२००९.**
3. **शासन निर्णय, उ.ऊ.व का.वि., क्रमांकः पवन-२०१०/प्र.क्र.१३४/ऊर्जा-७, दि.१४.७.२०१०.**
4. **शासन निर्णय, उ.ऊ.व का.वि., क्रमांकः अपाऊ-२००९/प्र.क्र.१५२८/ऊर्जा-७, दि.३.८.२००९.**
5. **शासन निर्णय, उ.ऊ.व का.वि., क्रमांकः अपाऊ-२०१०/प्र.क्र.३६०/ऊर्जा-७, दि.३.३.२०११.**
6. **शासन निर्णय, उ.ऊ.व का.वि., क्रमांकः अपाऊ-२०१२/प्र.क्र.४९/ऊर्जा-७, दि.१३.२.२०१३.**

**प्रस्तावना:-**

अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण दि.१४.१०.२००८ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आले. त्यानुसार सहकारी साखर कारखान्यांना ऊस खरेदी करातून १०० टक्के सूट पुढील १० वर्षांसाठी देण्याची तरतूद करण्यात आली होती. तद्नंतर दि.२७.१.२००९ च्या शासन निर्णयान्वये सदर ऊस खरेदी कराची सूट नवीन प्रकल्पांप्रमाणेच सध्या कार्यान्वित प्रकल्पांनाही पूर्वलक्षी प्रभावाने आर्थिक वर्ष २००६-०७ पासून १० वर्षांकरीता देण्याची तरतूद करण्यात आली.

अशा स्वरुपाचा लाभ घेताना राज्यास सहवीज निर्मिती प्रकल्पातून विशिष्ट क्षमतेपर्यंत वीज उपलब्ध व्हावी यासाठी, सर्वसाधारणत: २५०० T.C.D. क्षमतेच्या साखर कारखान्यांमधून अंदाजे १० ते १२ मे.वॅ. वीज निर्मिती होऊ शकते, कारखान्यांतील अंतर्गत वापर ३ ते ४ मे.वॅ. मर्यादेत असतो, प्रकल्पामधून ६ मे.वॅ. अतिरिक्त वीज पारेषित होऊ शकते, या बाबी विचारात घेऊन दि.३ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये सहवीज निर्मिती प्रकल्पाची अतिरिक्त पारेषित वीज क्षमता ६ मे.वॅ. (१.८५ कोटी युनिट) वा त्यापेक्षा अधिक असण्याची अट समाविष्ट करण्यात आली.

सदर अट कार्यान्वित प्रकल्पांना पूर्वलक्षी प्रभावाने लागू केल्याने अनेक साखर कारखान्यांना ऊस खरेदी करातून सूट मिळणे शक्य होत नव्हते. दरम्यानच्या कालावधीमध्ये राज्यात उद्भवलेली दुष्काळी परिस्थिती, ऊस उपलब्धतेची कमतरता आणि प्रकल्पधारकांनी केलेली मागणी विचारात घेऊन दि.१३.२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त पारेषित वीजेची किमान मर्यादा ६ मे.वॅ. (७५ लाख युनिट) वा त्यापेक्षा अधिक असण्याची अट समाविष्ट करण्यात आली.

राज्य शासनाच्या “अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण-२००८” अंतर्गत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सहवीज / वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणाऱ्या साखर

कारखान्यांना गाळपासाठी येणाऱ्या ऊसाच्या खरेदी करातून १०० टक्के सूट १० वर्षांसाठी देण्यात आली आहे. यासंदर्भातील दि.३.३.२०११ व दि.१३.२.२०१३ च्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाहीची अंमलबजावणी करताना येणा-या अडचणींचा विचार करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्य शासनाच्या “अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण-२००८” अंतर्गत सहवीज प्रकल्प आस्थापित करणाऱ्या साखर कारखान्यांना ऊस खरेदी कर सूट अनुज्ञेय आहे. त्यासाठी दि.३.३.२०११ व दि.१३.२.२०१३ च्या शासन निर्णयांन्वये काही अटी व शर्ती विहित केल्या आहेत. सदर दोन्हीही शासन निर्णय याद्वारे अधिक्रमीत करण्यात येत आहेत.

२. सहवीज / वीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित असलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत सन २००६-०७ पासून आणि त्यानंतर (सन २००६-०७ नंतर) कार्यान्वित होणाऱ्या प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून ऊस खरेदी कर सूट अनुज्ञेय राहील.

खाजगी साखर कारखाने आणि बूट (BOOT) तत्वावर प्रकल्प कार्यान्वित करणा-या सहकारी साखर कारखान्यांना, धोरणाची कार्यपध्दती विहित केल्यापासून (दि.१४.७.२०१०) व त्यानंतर कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांना प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून ऊस खरेदी कर सूट अनुज्ञेय राहील.

**३. वरील ऊस खरेदी कर सूट प्राप्त होण्यासाठी खालील अटी-शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील:-**

१) सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करणा-या साखर कारखान्यांनी महावितरण कंपनीस ६ मे. वॅ. वा त्यापेक्षा अधिक अतिरिक्त पारेषित वीज उपलब्ध करुन देण्याची क्षमता संबंधित प्रकल्पाची असणे आवश्यक आहे. पारेषित केलेली अतिरिक्त वीज किमान ७५ लाख युनिट असणे आवश्यक आहे. किमान वीज क्षमतेची अट ही कारखानानिहाय लागू राहील. अशा प्रकल्पांना ऊस खरेदी कराची सूट दहा वर्षांसाठी देण्यात येईल.

२) ज्या कार्यान्वित प्रकल्पांची पारेषित वीज क्षमता ६ मे. वॅ.पेक्षा कमी आहे, अशा सन २००६-०७ पूर्वी कार्यान्वित असलेल्या प्रकल्पांनी पारेषित वीज क्षमतेत ६ मे. वॅ. वा त्यापेक्षा अधिक वाढ केल्यानंतर त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने सन २००६-०७ पासून आणि त्यानंतर कार्यान्वित होणाऱ्या प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून ऊस खरेदी करात सूट देण्यात येईल. खाजगी आणि बूट तत्वावरील सहवीज निर्मिती प्रकल्पांच्या बाबतीत कार्यपध्दती विहित केल्यापासून (दि.१४.०७.२०१० पासून) आणि दि.१४.०७.२०१० नंतर कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून ऊस खरेदी करात सूट देण्यात येईल.

सदर सूट देण्यासाठी प्रकल्पाच्या मूळ स्थापित क्षमतेचा आणि त्यावर झालेल्या भांडवली गुंतवणूकीचा विचार करुन सदर रक्कमेची भरपाई होईपर्यंत अथवा दहा वर्षांचा कालावधी यापैकी जी घटना आधी घडेल तोपर्यंत ऊस खरेदी करात सूट देण्यात येईल. दरम्यानच्या काळात प्रकल्पधारकाने

मूळ स्थापित क्षमतेत वाढ केल्यास नविन क्षमतेसह होणाऱ्या एकूण भांडवली गुंतवणूकीचा विचार करुन, प्रकल्पधारकाने पूर्वीच्या स्थापित क्षमतेस अनुसरुन ऊस खरेदी कर सूट अंतर्गत घेतलेला लाभ वजा करुन, उर्वरित एकूण भांडवली गुंतवणूकीची परतफेड होईपर्यंत अथवा क्षमता वाढीपासून पुढील दहा वर्षाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत ऊस खरेदी कर सूट योजनेचा लाभ देण्यात येईल. प्रकल्पधारकास ऊस खरेदी सूट लाभांतर्गत कोणत्याही परिस्थितीत भांडवली गुंतवणूकीपेक्षा अधिक लाभ देय होणार नाही.

३) सहवीज निर्मिती प्रकल्पांतर्गत गुंतवणूकीची कमाल मर्यादा रुपये ५ कोटी प्रती मेगावॅट एवढी राहील.

४) प्रकल्प अधिक कार्यक्षमतेने कार्यरत राहाण्यासाठी प्रकल्पाची टॉपींग सायकल कार्यक्षमता ४५ टक्के वा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.

५) सहवीज निर्मिती प्रकल्पांना देय ठरणाऱ्या ऊस खरेदी कराची सूट वा त्याशिवाय इतर करांची थकबाकी असल्यास सदर थकबाकीची रक्कम भरणे आवश्यक राहील. अशा प्रकारच्या थकबाकीच्या वसूलीसंदर्भातील कार्यपध्दती वित्त विभागाने विहित करावी.

६) प्रस्तुत योजनेंतर्गत कार्यान्वित कालावधी अर्हता प्रमाणपत्रातील पात्र कालावधी संपल्यानंतर पाच वर्षापर्यंत असेल. एखाद्या सहकारी साखर कारखान्याने सदर कार्यान्वित कालावधी पूर्ण होण्याच्या अगोदर वीज प्रकल्प बंद केलेल्या तारखेपर्यंत उपभोगलेल्या संपुर्ण सूटीची रक्कम वार्षिक १२ टक्के व्याजासह त्वरीत एकरकमी भरावी लागेल.

७) सहवीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणाऱ्या संबंधित साखर कारखान्यांना ऊस खरेदी कराची सूट उपभोगण्यासाठी प्रकल्पातील किमान ६ मे. वॅ. ( ७५ लाख युनिट) वा त्यापेक्षा अधिक अतिरिक्त पारेषित वीज, केवळ महावितरण कंपनीशी वीज खरेदी करार करुन, त्याप्रमाणे महावितरण कंपनीस प्रत्यक्षात वीज पुरवठा करणे आवश्यक आहे.

८) ऊस खरेदी कर सूट संदर्भातील अर्हता प्रमाणपत्र महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण ऐवजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडून देण्यात यावे. सदर अर्हता प्रमाणपत्र देत असताना खालील बाबींची पुर्तता झाल्याची खातरजमा करण्यात यावी-:

अ) सहवीज निर्मिती प्रकल्पासाठी शासनाने दि.१४.१०.२००८ च्या आदेशान्वये जाहीर केलेल्या धोरणानुसार व दि.१४.७.२०१० च्या आदेशान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार, महाऊर्जाकडील मुलभूत सुविधा संमती पत्र.

ब) प्रकल्पाच्या टॉपींग सायकल कार्यक्षमतेबाबतचे वसंतदादा शुगर इन्स्टीटयूट यांनी दरवर्षी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

क) प्रकल्पातील ऊस गाळपासंबंधी साखर आयुक्त यांनी दरवर्षी प्रमाणित केलेली माहिती.

ड) संबंधित वर्षातील हंगामात वरीलप्रमाणे अतिरिक्त वीज पारेषित केल्याचे राज्य भार पुरवठा केंद्र (SLDC) यांचेकडील १०० टक्के वीज महावितरण कंपनीस पुरविली गेली असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

ई) साखर कारखान्यांनी प्रकल्पांतर्गत केलेली भांडवली गुंतवणूक खालीलप्रमाणे प्रमाणित करण्यात यावी:-

i) सहकारी साखर कारखान्यांच्याबाबतीत भांडवली गुंतवणूक साखर आयुक्त आणि सनदी लेखापाल यांच्याकडून प्रमाणित करण्यात यावी.

ii) खाजगी आणि बूट (BOOT) तत्वावरील सहवीज निर्मिती प्रकल्पांतर्गत केलेली भांडवली गुंतवणूक सनदी लेखापालाकडून प्रमाणित करण्यात यावी.

९)वरील प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर महावितरण कंपनीकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रमाणपत्र द्यावे. महावितरण कंपनीने सदर प्रमाणपत्र गाळप हंगाम संपल्यानंतर आणि अर्जदाराने सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर जास्तीत जास्त ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये द्यावे. सदर प्रमाणपत्र वित्त विभाग/ विक्रीकर विभागासही देण्यात यावे. यापुर्वीच्या गाळप हंगामाबाबतचे प्रमाणपत्र महावितरण कंपनीने संबंधित यंत्रणेला सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने आणि त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.विवि/शिकाना/३५ /करधान-३, दिनांक १०/१२/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१३११५४६५१०८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sharad Ranade

Digitally signed by Smita Sharad Ranade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy & Labour, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Smita Sharad Ranade
Date: 2014.01.31 17:03:06 +05'30'

**(स्मि.श.रानडे)**

**शासनाच्या सह सचिव**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई .
३. उपमुख्यमंत्री / सर्व मंत्री /सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

४. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबइ.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (सहकार), सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग.
१०.विक्रीकर आयुक्त, माझगाव, मुंबई.
११.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई (पत्राने) .
१५.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
१६.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
१७.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
१९. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे.
२०. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१.निवड नस्ती-ऊर्जा-७ कार्यासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

*****

## जोडपत्र- “अ”

## पात्रता प्रमाणपत्र

मे.................................................... यांनी कारखाना स्थळावर--------- मे.वॅ. क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प दि. ................. रोजी कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पास, शासनाने दि.१४.१०.२००८ च्या आदेशान्वये जाहीर केलेल्या धोरणानुसार व दि.१४.७.२०१० च्या आदेशान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार, महाऊर्जाचे मुलभूत सुविधा संमती पत्र प्राप्त झाले आहे. सदर कारखान्याने सादर केलेल्या सनदी लेखापाल/ साखर आयुक्त यांचेकडील प्रमाणित माहितीच्या आधारे सदर प्रकल्पाची गुंतवणूक रु........... इतकी आहे. साखर आयुक्त यांच्याकडील प्रमाणित माहितीनुसार कारखान्याने गाळप वर्ष------------ मध्ये .................. टन ऊसाचे गाळप केले आहे.

सदर कारखान्याने महावितरण कंपनी समवेत दि................ रोजी वीज खरेदी करार केला असून त्यान्वये १०० टक्के वीज महावितरण कंपनीस देण्यात येते. महावितरण कंपनीकडील प्रमाणित माहितीच्या आधारे सदर सहवीज निर्मिती प्रकल्पातून-................ युनिटस् अतिरिक्त वीज महावितरण कंपनीस पारेषित झाल्याचे निदर्शनास येते. सदर अतिरिक्त पारेषित वीज ७५ लाख युनिटस् पेक्षा जास्त आहे.

सन.............................. साठी सदर प्रकल्पाची टॅापिंग सायकल कार्यक्षमता वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, पुणे यांनी प्रमाणित केली असून ती.......... टक्के म्हणजेच ४५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. राज्य भार पुरवठा केंद्र यांचेकडील माहितीच्या अनुषंगाने ............ गाळप वर्षात सदर कारखान्याने अतिरिक्त वीज महावितरण कंपनीस पुरविली आहे.

सन...................................या वर्षातील ........... हंगामात अतिरिक्त वीज पारेषित केल्याचे राज्य भार पुरवठा केंद्र (SLDC) यांचेकडील प्रमाणपत्रानुसार १०० टक्के वीज महावितरण कंपनीस पुरविली आहे.

या अनुषंगाने मे......................... यांनी...................... शासन निर्णयातील अटींची पूर्तता केली असल्याने वित्त वर्ष ..............................करिता सदर कारखाना ऊस खरेदी करातील सूट मिळण्यास पात्र असून त्यांना त्यानुसार पात्रता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता.

------------